रयत शिक्षण संस्थेचे,

## सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स, श्रीरामपूर
## सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती-२०२२-२३ नवीन व नुतनीकरण
## बी.कॉम. / एम.कॉम. / बी.बी.ए. (सी.ए.)

दि. १०/०८/२०२२

फेब्रुवारी २०२२ मध्ये इयत्ता १२ वीत उत्तीर्ण झालेल्या सिनिअर महाविद्यालयातील पात्र सर्व विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरता येईल. महाराष्ट्र राज्यासाठी **७४१७ एवढ्याच** विद्यार्थ्यांना नवीन सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मंजुर होणार आहे. त्यामुळे अर्ज भरणाऱ्या सर्वच विद्यार्थ्यांना सदर शिष्यवृत्ती मिळत नाही याची संबंधीत अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी. अशा विद्यार्थ्यांनी सोबत दिलेल्या परिपत्रकात सविस्तर माहिती वाचून पात्र असणाऱ्या विद्यार्थ्यांनीच सदर अर्ज भरुन द्यावा. **सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन देणाऱ्या विद्यार्थ्यांना शासनाच्या इतर कोणत्याही फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्ती / फ्रि-शिपचा अर्ज भरता येणार नाही याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**मागील वर्षी अर्ज भरणाऱ्या विद्यार्थ्यांना सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती मिळालेली असेल अशा विद्यार्थ्यांनी अर्ज नुतनीकरण करावा. नुतनीकरणासाठी मागील वर्षी किमान ५०% गुण आवश्यक.**

**बी.कॉम. व एम.कॉम. मधील जे विद्यार्थी विनाअनुदानित ( नॉन ग्रँट ) तुकडीतील असतील अशा विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतलेल्या कॅटेगिरीचाच शिष्यवृत्ती अर्ज भरावा किंवा सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्ती अर्ज भरण्या अगोदर शिष्यवृत्ती विभागात चौकशी करावी मगच अर्ज भरावा.**

अनुदानित व विनाअनुदानित तुकडीत **( EBC/EWS )** प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना तसेच **SC, OBC, NT, SBC,ST,Handicap** शिष्यवृत्तीधारक **विद्यार्थ्यांना कोणत्यातरी एकाच फी सवलतीचा किंवा शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल.** ई.बी.सी. **( EBC/EWS )** मध्ये प्रवेश घेतलेल्या व कॅटेगिरीमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी सेंट्रल सेक्टर शिष्यवृत्तीचा अर्ज भरुन दिला **तर सदर विद्यार्थ्यांना पेईंग प्रमाणे फी भरावी लागेल याची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**सेंट्रल सेक्टर व श्रीराम फायनान्स शिष्यवृत्तीस पात्र असल्यास हे दोन्हीही अर्ज विद्यार्थ्यास भरता येईल.**

**मुदतीनंतर आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच विद्यार्थ्याच्या होणाऱ्या आर्थिक नुकसानीस महाविद्यालय जबाबदार राहणार नाही यांची संबंधीत विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**

**शिष्यवृत्ती अर्जास खालील कागदपत्रांची झेरॉक्स प्रत दिलेल्या नंबरनुसार सेल्फ अटेस्टेड करुन जोडावीत.**

१. ऑनलाईन भरलेला अर्ज.
२. ऑनलाईन बोनाफाईड
३. महाविद्यालय व्हेरिफिकेशन अर्ज.
४. शाळा सोडल्याचा दाखला व महाविद्यालयाचा दाखला
५. डोमासाईल सर्टिफिकेट / रहिवासी दाखला
६. रेशन कार्ड झेरॉक्स
७. आधार कार्ड झेरॉक्स
८. आधार कार्ड लिंक फॉर्म
९. सन २०२२-२३ मधील प्रवेश पावती.
१०. वार्षिक उत्पन्नाचा सन २०२१-२२ चा दाखला. उत्पन्न ४.५० लाख रु.च्या आत.
**(ओरिजनल उत्पन्न दाखला तहसिलदार यांचेकडील )**
११. दहावी व त्या पुढील सर्व गुणपत्रक
१२. बँक पासबुक

**अर्ज भरुन सर्व कागदपत्र सेल्फ अटेस्टेड करुन शिष्यवृत्ती विभागात दि.१०/०८/२०२२ ते ३१/१०/२०२२ अखेर सकाळी ११:०० ते दुपारी १:०० वाजेपर्यंत महाविद्यालयात जमा करावा. विद्यार्थ्यांनी ३१/१०/२०२२ या अर्ज भरण्याच्या शेवटच्या दिवसाची वाट न पाहता लवकरात लवकर अर्ज ऑनलाईन भरुन महाविद्यालयात जमा करावा.**

**अधिक माहितीसाठी सोबत दिलेले शासनाचे परिपत्रक पाहावे.**

प्र. प्राचार्य,
सी.डी.जैन कॉलेज ऑफ कॉमर्स,
श्रीरामपूर

Chandroop Dakale Jain College of Commerce Shrirampur

www.cdjcollege.com

सदर सूचना महाविद्यालयाच्या वेबसाईटवर देखील टाकण्यात आलेली आहे.

Schol.Dept./E./C.D. Jain College of Commerce/Shri. Wadankar D.S./Scholarship Notice